# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १३२-२३** **दिनांक :- २१/०४/२०२३**

## What's App Spoofing व्दारे होणाऱ्या फसवणूकीसंदर्भात दक्षता घेण्याबाबत मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाचे वतीने नागरिकांना आवाहन.

आजच्या दैंनदीन जीवनामध्ये नागरिक एकमेकांसोबत संवाद साधण्याकरीता व्हॉट्सॲपचा वापर मोठया प्रमाणावर करीत आहेत. हिच गोष्ट लक्षात घेवून सायबर गुन्हेगार वेगवेगळया क्लुप्त्यांचा वापर करुन व्हॉट्सॲपद्वारे नागरिकांच्या फसवणूक करण्याकरीता वेगवेगळे मार्गाचा अवलंब करीत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने व सध्या सुरु असणारा प्रकार म्हणजे नामांकीत कंपन्यांचे सी.ई.ओ., वरिष्ठ अधिकारी, उच्च पदस्थ अधिकारी यांचे फोटोचा वापर करुन व्हिपीएन क्रमांकाचा वापर करुन नागरिकांशी व्हॉट्सॲपद्वारे चॅटींग करुन विश्वास संपादन करीत आहेत. सायबर गुन्हेगार चॅटींग दरम्यान फ्लिपकार्ट, अमेझॉन, पेटीएम अशा वेगवेगळया ई कॉमर्स वेबसाईट/ ॲपद्वारे गिफ्ट कार्ड अथवा ॲप्पल गिफ्ट कार्डची मागणी करुन फसवणूक करीत आहेत.

***तरी सायबर गुन्हे कक्ष, मि.भा.व.वि. यांचेकडून नागरिकांना घ्यावयाची दक्षता:-***

१. अनोळखी व्हॉट्सॲप वरुन चॅटींग करीत असल्यास त्यांना प्रतिसाद देवू नका.
२. आपल्या व्हॉट्सॲपवर Two-Step Veification सेटींग Enable करुन ठेवा.
३. ओळखीच्या अथवा अनोळखी व्हॉट्सॲप वरुन गिफ्ट कार्डची मागणी करण्यात आली असल्यास संबधित व्यक्तीला फोनद्वारे संपर्क साधून खात्री करुन घ्या.
४. आपल्या व्हॉट्सॲप चा सिक्युरीटी कोडची मागणी केल्यास तो कोणासही देवू नका.
५. अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापुर्वी आधी विचार करा.
६. बँकेच्या कार्ड तपशील, पिन, ओटीपी पासवर्ड इत्यादी वैयक्तीक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करु नका.

तरी मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील नागरिकांना सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत की, अशा प्रकारे होणाऱ्या फसवणूकीबाबत सतर्क रहावे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

------oooo------